"In Pursuit of Global Competitiveness"

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

फोन – (०२४०)२३६६१०४ , २३३४३४८ फॅक्स – (०२४०) २३३२८३५

E-Mail – principalgeca@yahoo.com Web – http://www.geca.ac.in

जाक्र./शाअमऔ/लेखा/२०२०/ 166

दिनांक:– 9 JAN 2020

परिपत्रक

कालमर्यादित

विषय:– आयकर विवरणपत्र २०१९–२०२० अदा करणे बाबत.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यानलय,औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, त्यांचे २०१९–२०२० या आर्थिक वर्षातील माहे डिसेंबर २०१९ पर्यतचे वेतन व इतर मानधनाचे विवरणपत्र तयार करण्यात आलेले आहे. तरी ते त्यांनी दिनांक १० जानेवारी २०२० पासुन लेखा विभागातुन स्वत: हस्तगत करुन घ्यावे. याबाबत असेही कळविण्यांत येते की, संबंधितांनी वेतन व इतर मानधनाच्या रक्कमा या तपासून जे लाभ प्राप्त आहेत त्याची शहानिशा करुन **दिनांक २५ जानेवारी २०२० पर्यत माहे जानेवारी २०१९ मधील वेतनातून कपात करावयाचा आयकर लेखा विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील.**

याबाबत असेही सुचित करण्यांत येते की,चालनाने आयकर भरणा करणे नियमास अनुसरुन नसल्यामुळे वेतनातूनच आयकर कपात करणे बंधनकारक राहील. **चालनाने आयकर भरण्यांस परवानगी देण्यांत येणार नाही. तरी सर्व अधिकारी /कर्मचारी यांनी याबाबत कटाक्षाने दक्षता घ्यावी.** आयकर कपातीबाबत त्यांना भरणा करावयाच्या आयकरासाठी उपलब्ध अभिलेख्यानुसार उत्पन्न व वजातीचे विवरणपत्र डिसेंबर २०१९ पर्यतचे तयार करण्यांत आलेले आहे. तसेच वर्ग १ अधिकारी यांचे माहे जानेवारी २०२० ते फेब्रुवारी २०२० चे वेतन किती अपेक्षित आहे ही बाब विवरणपत्रात नमूद केलेली आहे. सन २०१९–२०२० या आर्थिक वर्षात आयकर गणना करुन पुराव्यासह (वेतनाव्यतिरिक्त बाहेरील गुंतवणूक असल्यास गुंतवणुक केल्याचा पुरावा) सादर करावीत. **संबंधिताने आयकर गणणापत्रक २०१९–२०२० चे विवरणपत्र दिनांक १० फेब्रुवारी २०२० पर्यत सादर करावेत.**जे अधिकारी/कर्मचारी हे विवरणपत्र लेखी सादर करणार नाहीत त्यांचे माहे फेब्रुवारी २०१९ चे वेतन हे आयकराच्या संपुर्ण कपातीची पुर्ण खात्री झाल्याशिवाय अदा करण्यांत येणार नाही याची सर्व अधिकारी /कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

**आर्थिक वर्ष २०१९–२०२० करीता सादर करावयाच्या आयकर गणना विवरणपत्राचा नमूना संस्थेच्या** www.geca.ac.in **या संकेतस्थळावर १० जानेवारी २०२० रोजी उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे.** तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी लेखा विभागात स्वत:चा पॅन नंबर तपासून खात्री करुन स्वाक्षरी करावी.

**प्राचार्य**

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,**

**औरंगाबाद**

प्रत:– सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता. सदरील परिपत्रक सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन द्यावे व विभागां अंतर्गत येणा–या सर्व अधिकारी व कर्मचारी यांची माहिती संकलित करुन माहे जानेवारी २०२० च्या वेतनातून किती कपात करावयाची हे एकत्रित लेखा विभागाकडे सादर करावी. तसेच विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वार्षिक आयकर विवरणपत्र दिनांक १० फेब्रुवारी २०२० पर्यत एकत्रित लेखा विभागाकडे सादर करावीत.

(स्थापत्य/विदुयत/अणुविदयुत/संगणक/माहिती तंन्नज्ञान/भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/गणित/यंत्र/

कर्मशाळा/एम.सी.ए./उपयोजित यंन्न/ग्रंथालय/भांडारपाल/टीपीओ/जिमखाना/परिक्षा

विभाग/कार्यालय/वस्तीगृह)